मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ८, ऑगस्ट २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## मा. कृषि राज्यमंत्री यांची विद्यापीठाला भेट









**दि. २८ ऑगस्ट, २०२१.** राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हे शेतकऱ्यांसाठी केलेल्या महत्वपूर्ण संशोधनामुळे तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असलेले या विद्यापीठातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी यामुळे प्रतिष्ठीत बनले आहे. विद्यापीठाचे कृषि क्षेत्रातील योगदान लक्षात घेता कृषि पंढरी समान राहुरी कृषि विद्यापीठाला संशोधनासाठी भरीव निधीची तरतुद केली जाईल असे प्रतिपादन राज्याचे कृषि राज्यमंत्री ना. डॉ. विश्वजीत कदम यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात विद्यापीठ शास्त्रज्ञ सुसंवाद बैठकीला मार्गदर्शन करतांना कृषि राज्यमंत्री मा. ना. डॉ. विश्वजीत कदम बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. याप्रसंगी फलोत्पादन राज्यमंत्री मा.ना. कु. आदिती तटकरे, नगर विकास व उर्जा राज्यमंत्री मा.ना. श्री. प्राजक्त तनपुरे, आ. श्री. रोहीत पवार, आ. श्री. लहू कानडे, कार्यकारी परिषद सदस्य आ. नरेंद्र दराडे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कृषि राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम पुढे म्हणाले की सध्याचे हवामान बदल लक्षात घेता कृषि विद्यापीठांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सध्याची स्थिती लक्षात घेता सेंद्रिय शेतीच्या संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. याप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी विद्यापीठाचा कृषि शिक्षण,

वर्ष :१, अंक क्रं. : ८, ऑगस्ट २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

संशोधन, विस्तार शिक्षण, प्रशासकीय व आर्थिक स्थितीचा आढावा सादर केला. यावेळी ते म्हणाले की कृषि विद्यापीठाचे कार्य सक्षमपणे चालवण्यासाठी प्राध्यापक व कर्मचारी यांच्या रिक्त जागा भरणे अत्यंत गरजेचे आहे. यावेळी कुलगुरु डॉ. पाटील यांच्या शुभहस्ते अतिवृष्टी पुरग्रस्तांसाठी विद्यापीठ कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा वेतनाचा रुपये ३९,८८,०८२ रकमेचा धनादेश मख्यमंत्री निधीसाठी कृषि राज्यमंत्र्यांकडे सुपूर्त केला. बैठकीचे स्वागत व प्रास्ताविक संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी केले. बैठकीला विद्यापीठाचे अधिकारी, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख व शास्त्रज्ञ उपस्थित होते. सकाळच्या सत्रामध्ये मान्यवरांनी उद्यानविद्या विभागाच्या प्रक्षेत्रावरील विविध फळपिकांचे प्रात्यक्षिक, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, कोरडवाहू फळपिके संशोधन प्रकल्प आणि उद्यानविद्या रोपवाटीका या प्रकल्पांना भेटी दिल्या.

## राज्यातील ऊस लागवडीखालील क्षेत्रात राहुरी विद्यापीठाच्या वाणांचा ९० टक्के वाटा







**दि. २० ऑगस्ट, २०२१.** महाराष्ट्र राज्यामध्ये एकुण २०० साखर कारखाने आहेत. या साखर कारखान्यांची वार्षिक उलाढाल अंदाजे २५ हजार कोटी इतकी आहे. राज्यामध्ये ऊस लागवडीखाली १० लाख हेक्टर क्षेत्र आहे. या क्षेत्रापैकी ९० टक्के क्षेत्र हे महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसीत ऊस वाणांखाली आहे. या साखर कारखान्यांमध्ये अंदाजे १५ हजार कुशल व अकुशल कर्मचारी कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त या कारखान्यांना ऊस तोडण्यासाठी १०–१२ लाख मजूर राज्यातील कोरडवाहू भागातून येत असतात.  या मजूरांना वर्षातील सहा महिन्यांचा शाश्वत रोजगार उपलब्ध होतो. तसेच ऊस वाहतूकीसाठी लाखो ट्रका, ट्रॅक्टर, बैलगाड्या या साधनांचा ऊस वाहतूकीसाठी वापर होतो. एकुणच या साखर

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं : ८, ऑगस्ट २०२१

कारखान्यांमुळे ग्रामीण भागाचा विकास झालेला दिसून येतो. असे हे कारखाने फायद्यात आणायचे असतील तर या कारखान्यांना उसाचे चांगले संशोधीत वाण जे अधिक उत्पादन आणि अधिक उतारा देतील अशा वाणांची आवश्यकता असते. हा ग्रामीण भागाचा आर्थिक गाडा सक्षमपणे चालविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रातील निर्मित ऊस वाण महत्वाची भूमिका बजावत आहेत. राज्यातील ऊस कारखान्यांचे बॉयलर हे या प्रगत वाणांमुळेच सुरु आहेत. आत्तापर्यंत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधनातून ऊसाचे अधिक उत्पादन आणि साखर उतारा देणारे १४ वाण प्रसारीत केले आहेत. महाराष्ट्र राज्यात एकुण उसाच्या क्षेत्रापैकी सन २०१९–२० मध्ये को ८६०३२ या वाणाखाली ४८.४९ टक्के क्षेत्र, फुले २६५ या वाणाखाली ३४.२२ टक्के क्षेत्र, फुले १०००१ या वाणाखाली ४.१७ टक्के क्षेत्र, को ९२००५ या वाणाखाली ३.६७ टक्के क्षेत्र असे एकुण ९०.५५ टक्के क्षेत्र महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या वाणांखाली आहे. या वाणांनी आत्तापर्यंत महाराष्ट्र राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रु. १३२४६८ कोटी दिले आहे.

सन २००९ पूर्वी उसाखालील क्षेत्र कमी झाले होते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे पाण्याच्या अति वापरामुळे उसाखालील जमिनी क्षारपड होवून नापीक झाल्या होत्या. याचा परिणाम साखर उत्पादन आणि अप्रत्यक्षरीत्या साखर कारखान्यांवर अवलंबून असलेल्या शेतकरी आणि कामगार वर्गावर झाला होता. परंतु, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने विकसीत केलेले फुले २६५ या वाणाने या क्षारपड जमिनीमध्ये ऊस उत्पादनात क्रांती केली. यामुळे क्षारपड जमिनीसुध्दा चांगले उत्पादन देवू लागल्या. याचा परिणाम ऊस आणि साखर उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.



महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राने केवळ राज्यातीलच नव्हे तर देशातील ऊस संशोधनात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. या केंद्राने विकसीत केलेल्या ऊस वाणांखालील महाराष्ट्रात ९० टक्के क्षेत्र आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती झाली असून महाराष्ट्र राज्य हे साखर उत्पादनात देशात अग्रेसर आहे.

**– कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील**

आजपर्यंत महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने शेतकऱ्यांसाठी उसाचे १४ उन्नत वाण आणि १०२ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारीत केलेल्या आहेत. या विकसीत वाणांमुळे ऊस उत्पादकांमध्ये आर्थिक स्थैर्य आलेले आहे. म्हणुनच या संशोधन केंद्राचे कार्य दिशादर्शक आहे.

**– डॉ.शरद गडाख, संशोधन संचालक**

यापूर्वी सन १९९६ साली महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने संशोधीत केलेला को ८६०३२ हा वाण मध्यम उशिरा पक्व होणारा, अधिक उत्पादनक्षमता, अधिक साखर उतारा, उत्तम खोडवा, रोग व कीड प्रतिकारक्षम, पाण्याचा ताण सहन करणारा, पूरबूडीत क्षेत्रात तग धरणारा आणि अनेक खोडवे देवू शकणारा वाण शेतकऱ्यांच्या व कारखान्याच्या पसंतीस पडला आहे. या व्यतिरिक्त महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले फुले १०००१, को ९२०५ या उसाच्या वाणांखाली क्षेत्र वाढत आहे असे ऊस पैदासकार डॉ. रामदास गारकर म्हणाले

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पाडेगाव मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राने गेल्या ८८ वर्षात ऊस संशोधनाचे भरीव कार्य केले आहे. या केंद्राद्वारे राज्यातील सर्व साखर कारखान्यांना त्यांच्या गरजेनुसार ऊसाच्या प्रसारीत जातींचा अनुवंशीकदृष्ट्या शुध्द मुलभूत बियाणे हे पायाभुत बेणे निर्मितीसाठी देण्यात येते.

**– डॉ. भरत रासकर, ऊस विशेषज्ञ**

कमी साखार उतारा असला तर कारखाना चालवणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. म्हणुनच महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले उसाचे वाण साखर कारखान्यांना संजीवनी ठरत आहे. उसाच्या या वाणांमुळे शेतकऱ्यांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थिती उंचविण्यास मदत झाली आहे. काही शेतकऱ्यांनी त्यांच्या घरांना ऊस वाणाचे नांव दिलेले आहे. असे अनेक उदाहरणे आहेत की या ऊसाच्या वाणांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य लाभले आहे. या ऊस वाणांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात गोड क्रांती आली आहे. राज्यातील साखर कारखाने जे सुरु आहेत हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या ऊस वाणांमुळेच नफ्यात आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहात संपन्न





**दि. १५ ऑगस्ट, २०२१.** आज आपण सर्वजन भारतीय स्वातंत्र्याचा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. स्वातंत्र्यदिनाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष असून आपल्या स्वातंत्र्यविरांनी केलेल्या त्यांच्या ज्वाजल्य अशा बलीदानातून, सर्वस्वाच्या त्यागातून आजचा सोनेरी दिवस आपण सर्वजन अनुभवत आहोत. देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या जवानांना तसेच आपल्या

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२१



सर्वांना अन्नधान्य पुरवण्यासाठी शेतात अविरत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला आपण अभिवादन केले पाहिजे. कोरोनाच्या जागतीक महामारीच्या पार्श्वभूमीवर आपल्या विद्यापीठाने गेल्या दोन वर्षात शौक्षणीक क्षेत्रात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकडे विशेष लक्ष दिले. देशात प्रथमच ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा वापर करुन मुलांचा अभ्यासक्रम पुर्ण केला. या आपल्या कामाला देशपातळीवर नावाजले गेले. फुले रोबोटचे प्रथम पारिताषिक, कास्ट प्रकल्पाद्वारे केलेल्या कामासाठी तीन पारितोषिके, एन.सी.सी., एन.एस.एस. च्या उपक्रमातून आपल्या विद्यार्थ्यांची देश पातळीवर निवड तसेच आपल्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या रु. एक कोटीपर्यंत शिष्यवृत्त्या हे आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संचालक विस्तार शिक्षण तथा संशोधन डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलींद अहिरे, विशेष कार्य अधिकारी डॉ. महानंद माने, मुख्य शास्त्रज्ञ बियाणे डॉ. आनंद सोळंके, सर्व विभाग प्रमुख, सुरक्षा अधिकारी प्रा. सुनिल फुलसावंगे, सहाय्यक सुरक्षा अधिकारी श्री. गोरख शेटे उपस्थित होते.  यावेळी कुलगुरुंच्या हस्ते मुलींच्या वसतिगृहामधील हॉलीबॉल ग्राउंडचे उद्घाटन, मुलांच्या वसतिगृह येथील फुलपाखरु उद्यानाचे उद्घाटन, बेकरी युनिट येथे अश्वगंधा, आवळा, बेहडा, शतावरी आणि पुदिनायुक्त कुकीज उत्पादनाचे उद्घाटन, कास्ट प्रकल्पाच्या नविन इमारतीचे उद्घाटन, मत्स्य तलावाचे उद्घाटन व कास्ट कासम प्रकल्पाच्या प्रक्षेत्र कार्यालयाचे उद्घाटन व प्रकल्पाला भेट देण्यात आली. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर खबरदारी घेत यावेळी सर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या फुले १०००१ ऊस वाणास राष्ट्रीय पातळीवर मान्यता






**दि. २४ ऑगस्ट, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव या केंद्राने एम. एस. १३०८१ (फुले १०००१) हा ऊसाचा लवकर पक्व होणारा वाण कोएम. ०२६५ व एम.एस. ०६०२ या दोन वाणांच्या संकरातुन निर्माण केलेला आहे. परभणी येथे झालेल्या ४५ व्या संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या २९ ते ३१ मे, २०१७ मध्ये पार पडलेल्या बैठकीत फुले १०००१ हा नवीन वाण सुरु आणि पुर्व हंगामात महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस केलेला आहे. केंद्रीय बियाणे समितीने महाराष्ट्रात या वाणाची लागवड करण्यास दि. २ एप्रिल २०१९ (नोटिफिकेशन नं. १४९८ अ) मध्ये मान्यता दिलेली आहे. मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे विकसित करुन प्रसारित केलेला हा पहिलाच ऊस वाण आहे. एम. एस. १३०८१ (फुले १०००१) या वाणाच्या अखिल भारतीय

पातळीवरील दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडु, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, कर्नाटक, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र (द्विपकल्पीय विभागात) या ९ राज्यातील १४ वेगवेगळ्या संशोधन केंद्रावर एम.एस. १३०८१ या नंबरने सन २०१६-१७ आणि २०१७-१८ या दोन वर्षात एकुन ३४ चाचण्या घेण्यात आल्या. या ३४ चाचण्यामध्ये (२ लागण पिके आणि १ खोडवा) ऊस उत्पादन, साखर उत्पादन आणि साखर उतारा या बाबतीत हा वाण तुल्यवाण कोसी ६७१ आणि को. ८६०३२ या वाणांपेक्षा सरस आढळुन आल्यामुळे दि.१९.१०.२०२० रोजी लखनऊ येथे ऑनलाईन झालेल्या अखिल भारतीय समन्वीत ऊस संशोधन प्रकल्पाच्या ३३ व्या द्विवार्षिक कार्यशाळेत या वाणाची दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडु, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, कर्नाटक, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र (द्विपकल्पीय विभागात) या ९ राज्यात लागवडीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. पूर्वहंगामात एम.एस. १३०८१ (फुले १०००१) या वाणाचे सरासरी ऊस आणि साखर उत्पादन अनुक्रमे १५१.०९ मे.टन/हे. आणि २१.५३ मे.टन/हेक्टर मिळालेले आहे. तथापि काही शेतकऱ्यांनी या जातीचे एकरी १०० मे.टन पेक्षा अधिक उत्पादन घेतलेले आहे. ही जात मध्यम ते भारी जमिनीत तसेच क्षारपड जमिनीतही चांगली वाढते. महाराष्ट्रात या वाणाची ५ टक्केपेक्षा अधिक क्षेत्रावर लागवड केली जात असुन नजिकच्या काळात या वाणाखालील क्षेत्र वाढणार असल्याचे पाडेगाव येथील शास्त्रज्ञांनी सांगितले आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर, ऊस पैदासकार डॉ. रामदास गारकर आणि पाडेगाव येथील सर्व शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे.

## हवामान बदल व पीक पध्दती विषयावर शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन




**दि. ५ ऑगस्ट, २०२१.** मानवाने विकासाच्या नावाखाली औद्योगिकरण करतांना नैसर्गिक साधन संपत्तीचा अमर्याद वापर केला. त्यातुन झालेली तापमान वाढ पर्यायाने हवामानातील बदलाला कारणीभुत ठरली. यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले. गारपीट तसेच वादळांचे प्रमाण यात वाढ झाली. आजपर्यंत न दिसलेल्या किडी व रोगांचे प्रमाण वाढून या सर्वांचा शेतीवर

विपरीत परिणाम झाला. या सगळ्या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांनी हवामान बदलानुसार पीक पध्दतीची आखणी करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र आणि ग्रामिण विकास व शिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान बदल व पीक पध्दती (ऑनलाईन) शेतकरी शास्त्रज्ञ चर्चासत्राचे आयोजन विस्तार शिक्षण विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात डॉ. पी.जी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुजरात येथील गांधीनगरच्या कामधेनु विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एम.सी. वार्ष्णेय होते. यावेळी नवी दिल्ली येथील शिक्षण व संशोधन ग्रोथ या केंद्राचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टीट्युट, पुणेचे अध्यक्ष डॉ. संजय बी. चोरडीया, कार्यक्रमाचे निमंत्रक कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर, संयोजक विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी विभाग व प्रमुख संशोधक, कास्ट प्रकल्प डॉ. सुनिल गोरंटीवार, सहसंयोजक विभाग प्रमुख (कृषि हवामान), कृषि महाविद्यालय, पुणेचे डॉ. जयवंत जाधव, ग्रामीण विकास व शिक्षण संस्था, पुणेचे उपाध्यक्ष श्री. चिटणीस, श्री. नाडगोडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वार्ष्णेय हवामानातील बदल या विषयावर बोलतांना म्हाणाले की जंगलाला लागणाऱ्या आगी, थर्मल पॉवर स्टेशन्स, अमर्याद वृक्षतोड, उसाचे पाचट तसेच गव्हाचे, तुरीचे काड जाळणे यामुळे वातावरणात कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण मोठ्या प्रमांणात वाढते. याचा प्रतिकूल परिणाम शेतीवर होऊन तापमानात वाढ होत आहे. दुसरे प्रमुख पाहुणे डॉ. चोरडीया आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शालेय शिक्षणापासून विद्यार्थ्यांना शेती हा विषय शिकवीला पाहिजे तरच त्यांच्यामध्ये शेतीविषयी आवड निर्माण होईल. शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये स्वयंचलीत यांत्रिकीकरण, तापमान नियंत्रीत करुन केली जाणारी काटेकोर शेती, हवामानातील बदलानुसार पीक पध्दतीत बदल हे बदल घडवावे लागतील. विद्यार्थ्यांनी पदवीचे शिक्षण घेत असतांनाच स्वतःचे स्टार्टअप सुरु करुन पदवी संपल्यानंतर एखाद्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची निर्मिती सुरु करता येईल असे मार्गदर्शन संशोधन संस्थानकडून होणे गरजेचे आहे. डॉ. जयवंत जाधव यांनी हवामान बदल व पीक पध्दत तसचे डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी तर आभार डॉ. सुनिल मासाळकर व श्री. नाडगोडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. शुभांगी घाडगे, इंजि. मोहसीन तांबोळी यांनी कार्यक्रम समन्वयक म्हणुन काम पाहिले. या चर्चासत्रासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची पाडेगाव संशोधन केंद्राला भेट





**दि. ७ ऑगस्ट, २०२१.** पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राने आजपर्यंत ऊस संशोधनात भरीव असे योगदान दिले आहे.

त्यामुळे संपूर्ण देशातील साखर कारखानदार व शेतकरी या दोघांचाही आर्थिक स्तर उंचावला आहे. या संशोधन केंद्रास आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनविण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, मांजरी यांच्या प्रमाणेच एक रुपया प्रति टन या प्रमाणे निधी देण्यात यावा. पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने महाराष्ट्रच नव्हे तर देशाला ऊस बेणे पुरवठा करणारे केंद्र म्हणुन नावलौकीक मिळवावा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. कुलगुरु डॉ. पाटील यांचा पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राच्या आपल्या पहिल्या भेटी प्रसंगी पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सभासद श्री. प्रशांत शेंडे, पाडेगावच्या सरपंच सौ. स्मिता खरात, कृषि पदविधर संघटनेचे श्री. सतीश शिंदे यांनी सत्कार केला. या सत्कारानंतर मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. रासकर यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की या संशोधन केंद्राने गेल्या ८८ वर्षात प्रामुख्याने उसाचे १४ वाण प्रसारीत केले असून राज्यातील ९० टक्के क्षेत्र या वाणांखाली आहे. आतापर्यंत केंद्राने ऊस उत्पादन वाढीच्या तंत्रज्ञानाच्या ९३ शिफारशी दिलेल्या आहेत. कुलगुरुंनी प्रक्षेत्रावरील उसाचे विविध प्रयोग, नविन जाती पैदास आणि बिजोत्पादन प्लॉटचे पाहणी करुन समाधान व्यक्त केले. यावेळी ऊस संशोधन केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी तर आभार डॉ. सुरेश उबाळे यांनी मानले.

## विभागीय कृषि संशोधन केंद्राला कुलगुरुंची भेट







**दि. १९ ऑगस्ट, २०२१.** शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीबरोबर अन्न सुरक्षेच्या क्षेत्रात विभागीय संशोधन केंद्राने केलेले काम प्रशंसनीय आहे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. कोल्हापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या भेटी प्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. येथील संशोधन केंद्राने विकसीत केलेल्या

चाऱ्याच्या ऑफ्रिकन टॉल या जातीच्या लागवडीखाली राज्यातील तीन चतुर्थांश क्षेत्र असणे हे कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी संशोधन केंद्राचे प्रमुख तथा सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम होले यांनी विविध संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले. यावेळी शाहु कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुमार गुरव, मका सुधार प्रकल्पाचे डॉ. सुनिल कराड, ऊस व गुळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम, नाचणी संशोधन प्रकल्पाचे डॉ. योगेश बन, पंढरपुरी म्हैस प्रकल्पाचे डॉ. महेंद्र यादव, ग्रामिण कृषि हवामान योजनेचे तंत्र अधिकारी मयुर सुतार यांनी संशोधन कार्याची माहिती दिली. यावेळी मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गंगाधर पाटील, विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. अशोक पिसाळ, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शैलेश कांबळे, कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. अविनाश भोसले, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. रविकिरण माने, वनस्पती रोगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वसंत पाटील व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. संग्राम धुमाळ उपस्थित होते.

## कुलगुरुंची बोरगाव कृषि विज्ञान केंद्राला भेट





**दि. १० ऑगस्ट, २०२१.** सातारा जिल्हयातील शेतकऱ्यांना बोरगांव येथे अद्ययावत तंत्रज्ञान पाहण्यास मिळावे व त्याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. प्रगतशील शेतकऱ्यांना राष्ट्रीय स्तरावर विविध सन्मानासाठी प्रोत्साहित करुन तंत्रज्ञान प्रसार करावा. सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्र मॉडेल व्हावे असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव व कृषि तंत्र विद्यालय, बोरगांव येथे सदिच्छा भेटी प्रसंगी कुलगुरु डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी त्यांनी कृषि विज्ञान केंद्रातील सर्व उपक्रमांची माहिती घेतली व प्रात्यक्षिकांची पाहणी केली. प्रक्षेत्रावरील पीक प्रात्यक्षिकाची पाहणी तसेच किचनगार्डनचे प्रात्यक्षिकाची पाहणी केली. रोपवाटीका, हळद व निशिगंध तसेच सघन पेरु लागवड, अंडी उबवणी, चारा पीक प्रात्यक्षिक इ. प्रकल्पास प्रत्यक्ष भेट देवून तसेच मागील वर्षीच्या उपक्रमांची माहिती घेऊन त्यांनी मार्गदर्शक सुचना केल्या. प्राचार्य प्रा. मोहन शिर्के यांनी कुलगुरु डॉ. पाटील यांचे स्वागत केले. यावेळी कृषि विज्ञान केंद्रातील तसेच कृषि तंत्र विद्यालयातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रजला भेट




**दि. १० ऑगस्ट २०२१.** हळद महाराष्ट्रातील प्रमुख नगदी मसाला पीक आहे. हळदीचा उपयोग रोजच्या आहारात, औषधे, सौदर्यप्रसाधने, जैविक किटकनाशकांमध्ये मोठ्या प्रमाणात होत असतो. लागवडीनंतर उत्पादीत हळदीचे मुल्य वाढविण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. यासाठी हळद प्रक्रिया उद्योगातून तयार होणाऱ्या हळद पावडरचा फुले हळद या नावाचा ब्रँड विकसीत करा असे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. कसबे डिग्रज (ता. मिरज, जि. सांगली) येथील कृषि संशोधन केंद्रातील आयोजीत कार्यक्रमात कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. यावेळी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. दिलीप कठमाळे यांनी कुलगुरु डॉ. पाटील यांचे स्वागत केले. येथील हळद बिजोत्पादन केंद्राची पाहणी यावेळी कुलगुरुंनी केली. यावेळी सभासद शेतकरी प्रशांत पाटील, रवी पाटील, शरद पवार, प्रमोद पाटील यांनी अनुभव कथन केले. याप्रसंगी डॉ. भरत पाटील, डॉ. मिलिंद देशमुख, डॉ. श्रीमंत राठोड, डॉ. मनोज माळी, डॉ. संजय तोडमल, डॉ. राजेंद्र भाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोज माळी तर आभार डॉ. श्रीमंत राठोड यांनी मानले.

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२१



## कुलगुरुंचे शुभहस्ते बाबुर्डी घुमट येथे स्वयंचलित हवामान केंद्राचे उद्घाटन









**दि. ३० ऑगस्ट, २०२१.** हवामान बदलामुळे पावसात अनियमितता आली आहे. यासाठी हवामान अद्ययावत शेती करणे गरजेचे आहे. हवामान अद्ययावत शेती करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे गरजेचे आहे. यासाठी बाबुर्डी घुमट गावामध्ये विद्यापीठ–खाजगी भागीदारीतून स्वंयचलित हवामान केंद्र बसविण्यात आले असून त्याचबरोबर फुले इरीगेशन शेड्युलर ॲप आणि ऑटोमॅटीक पंप कंन्ट्रोलर शेतकऱ्यांना देण्यात आले आहे. बाबुर्डी घुमट हे गाव स्मार्ट व्हीलेज आणि आदर्श गांव बनवून सर्व गावांसाठी एक मॉडेल व्हीलेज म्हणुन साकार करु असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील जागतिक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाची माजी विद्यार्थी संघटना आणि सेवा स्वंयसेवी संस्था, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बाबुर्डी घुमट गांवामध्ये स्वयंचलीत हवामान केंद्राचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. पाटील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी नवी दिल्ली येथील भा.कृ.अ.प.चे उपमहासंचालक डॉ. आर.सी. अग्रवाल, नाहेप प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रभात कुमार, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार ऑनलाईन उपस्थित होते. याप्रसंगी विद्यापीठाचे

अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, कास्ट–कासम प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, मृद व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे, नियंत्रक श्री. विजय कोते, मेडाचे जनरल मॅनेजर श्री. हर्षल भास्करे, सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, ग्रामसेविका सौ. निलीमा बनकर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपमहासंचालक डॉ. अग्रवाल मार्गदर्शन करतांना म्हणाले आत्मनिर्भर भारत करण्यासाठी डिजीटल तंत्रज्ञानाचा अचूकपणे वापर करणे गरजेचे आहे. डिजीटल तंत्रज्ञान शेतकरी आत्मसात करण्यास वेळ लागतो पण त्यात त्यांचा वेळ आणि पैसा वाचत असेल तर ते निश्चितच आत्मसात करतात. डॉ. प्रभात कुमार म्हणाले एकात्मिक डिजीटल तंत्रज्ञानाचा फायदा शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि पैसा वाचवतो हे बाबुर्डी घुमट या गावाने सिध्द केले आहे. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी स्वयंचलीत हवामान केंद्र, हवामान अंदाज दर्शविणारा डिजीटल फलकाचे उद्घाटन कुलगुरुंच्या हस्ते करण्यात आले. स्वयंचलीत हवामान केंद्र उभारण्यासाठी सेवा स्वयंसेवी संस्थेने आर्थिक सहाय्य दिले तसेच विद्यापीठ विकसीत फुले इरिगेशन शेड्युलर ॲप शेतकऱ्यांच्या मोबाईलमध्ये स्थापीत करण्यात आले आणि ॲटोमॅटीक पंप कंन्ट्रोलरचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले. या एकात्मिक डिजीटल तंत्रज्ञानाचा डेमो भाऊसाहेब परभणे यांच्या शेतावर घेण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवाजी परभणे, एकनाथ माने, रखमाजी मोरगे शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम.जी. शिंदे यांनी केले तर आभार जनार्धन माने यांनी मानले.

## हवामानावर आधारित कृषि सल्ला सेवा या विषयावर ऑनलाईन कार्यक्रम




**दि. २२ ऑगस्ट, २०२१.** हवामान बदलामुळे कृषी क्षेत्रावर येणाऱ्या नैसर्गिक समस्यांचे निवारण करण्यासाठी हवामान आधारित कृषि सल्ला सेवा या तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास कृषि उत्पादन वाढ होण्यास मदत होईल असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. जागतिक बँक अर्थसहाय्यित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने, हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ८, ऑगस्ट २०२१

व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत माहिती आणि दळणवळणाच्या साधनांद्वारे हवामानावर आधारित कृषि सल्ला सेवा या विषयावर तीन आठवड्याचा ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व प्रोसोईल प्रकल्प, जीआयझेड, नवी दिल्लीतर्फे नुकताच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कुलगुरु डॉ. पाटील अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हैदराबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेचे संचालक डॉ. विनोद कुमार सिंग उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता डॉ अशोक फरांदे, संशोधन संचालक डॉ शरद गडाख, नवी दिल्ली येथील प्रोसोईल प्रकल्प, जीआयझेडचे व्यवस्थापक श्री. राजीव अहल हे उपस्थित होते. यावेळी डॉ. विनोद कुमार सिंग यांनी आपल्या भाषणात बोलतांना हवामान बदलामुळे कृषि क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख केला व केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था, हैदराबाद अंतर्गत करण्यात आलेल्या विविध संशोधनाची माहिती दिली. या अभ्यासक्रमाचे संयोजक प्रकल्प प्रमुख (कास्ट) डॉ. सुनिल गोरंटीवार, जीआयझेड, नवी दिल्लीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. इंद्रनील घोष, सहसंयोजक डॉ मुकुंद शिंदे, जीआयझेड, पुणेचे संचालक इंजि. रणजीत जाधव, सहसंचालक म्हणुन डॉ. रवि आंधळे, विभाग प्रमुख डॉ. जयवंत जाधव यांनी काम पहिले. तसेच या अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणुन डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. स्नेहल कानडे व इंजि. मोहसीन तांबोळी यांनी केले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी देशभरातून एकूण १०७ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला सेवा विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न




**दि. २ ऑगस्ट, २०२१.** हवामान बदलामुळे कृषी क्षेत्रावर येणाऱ्या समस्यांचे निवारण करण्यासाठी हवामानावर आधारित कृषी सल्ला सेवा हे महत्वाचे साधन असुन माहिती आणि दळणवळणाच्या साधनांचा वापर केल्यास हवामानावर आधारित कृषी सल्ला वेळेत शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे शक्य होईल जेणे करून हवामान बदलामुळे कृषि क्षेत्राचे कमीतकमी नुकसान होईल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. जागतिक बँक अर्थसहाय्यित,

राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती आणि दळणवळणाच्या साधनांद्वारे हवामानावर आधारित कृषी सल्ला सेवा या विषयावर तीन आठवड्याचा ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व प्रोसोईल प्रकल्प, जीआयझेड, नवी दिल्लीतर्फे दिनांक २ ते २२ ऑगस्ट, २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरुन डॉ. पाटील बोलत होते. या प्रसंगी डॉ. के.के. सिंग, प्रमुख, कृषी सल्ला सेवा विभाग, भारतीय हवामानशास्त्र विभाग, नवी दिल्ली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून म्हणून नवी दिल्ली येथील प्रोसोईल प्रकल्प जीआयझेडचे व्यवस्थापक श्री. राजीव अहल हे उपस्थित होते.

डॉ. के.के. सिंग यावेळी मार्गदर्शन करतांना हवामान बदलामुळे कृषी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांची व भारतीय हवामानशास्त्र विभाग, नवी दिल्ली अंतर्गत करता येणाऱ्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी श्री. अहल यांनी प्रोसोईल प्रकल्प, जीआयझेड व मफुकृवि, राहुरी यांच्या सहयोगी उपक्रमांची माहिती दिली व कास्ट प्रकल्प, राहुरी यांनी कोरोना काळात सुरु केलेल्या वेगवेगळ्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे कौतुक केले. या अभ्यासक्रमाचे संयोजक म्हणून डॉ सुनिल गोरंटीवार व प्रोसोईल प्रकल्प, जीआयझेड, नवी दिल्लीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. इंद्रनील घोष, सहसंयोजक म्हणून प्रकल्प सहप्रमुख (कास्ट) डॉ. मुकुंद शिंदे, व इंजि. रणजीत जाधव, तांत्रिक सल्लागार,प्रोसोईल प्रकल्प,जीआयझेड, पुणे, संचालक म्हणून डॉ.रवि आंधळे, प्राध्यापक (हवामानशास्त्र), सहसंचालक म्हणून डॉ. जयवंत जाधव, विभाग प्रमुख, हवामानशास्त्र यांनी काम पाहिले. तसेच या अभ्यासक्रमाचे नियोजन संशोधन सहयोगी डॉ वैभव मालुंजकर, डॉ स्नेहल कानडे व इंजि. मोहसीन तांबोळी यांनी केले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी देशभरातून एकूण १०५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

## हवामान स्मार्ट शेतीसाठी धोरणे या विषयावरील ऑनलाईन अभ्यासक्रमाचे आयोजन



**दि. ९ ऑगस्ट, २०२१.** गेल्या काही वर्षांपासून हवामान बदलाचा परिणाम देशातच नव्हे तर सर्व जगभर जाणवत आहे. हवामान बदलाच्या प्रादुर्भावामुळे पावसाची अनियमितता, घटते जंगलक्षेत्र, जंगलांना लागणाऱ्या आगी, समुद्राच्या पाणी पातळीतली वाढ या सर्व कारणांमुळे कृषि क्षेत्र सर्वात जास्त बाधीत झाले आहे. भविष्यात कृषि क्षेत्राला हवामान बदलाच्या अनिष्ठ परिणामांपासून वाचवायचे असेल तर राज्य तसेच देश पातळीवरील सरकारी संस्था, खाजगी संस्था तसेच संशोधक या सर्वांनी एकत्र येवून योग्य उपाय योजनांसह अनकुल धोरणे तयार करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील जागतिक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राच्या वतीने हवामान स्मार्ट शेतीसाठी धोरणे, संस्था व विपणन या विषयावर तीन आठवड्यांचा ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. मिलिंद अहिरे, प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, नवी दिल्ली येथील मका संशोधन केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शंकरलाल जाट, सहनिमंत्रक डॉ. मुकुंद शिंदे हे उपस्थित होते. यावेळी डॉ. फरांदे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की हवामान बदलावर आधारीत तंत्रज्ञानाचा वापर शेती क्षेत्रासाठी महत्वाचा ठरणार आहे. हरितक्रांतीमुळे आपला देश अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्णच नव्हे तर इतर देशांना पुरवठा करण्यामध्ये वरच्या क्रमांकावर आहे. यावेळी डॉ. मिलिंद अहिरे यांनी प्रास्ताविक केले व या प्रमाणपत्र अभ्यास कामासंदर्भात माहिती दिली, डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कास्ट–कासम प्रकल्पाची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला राष्ट्रीय सेवा योजनेतील दोन पुरस्कार जाहीर





**दि. १२ ऑगस्ट, २०२१.** सन २०२०–२१ चे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाले असून यात महात्मा फुले कृषि विद्यापीठातील विद्यार्थी अनिकेत वाकळे यांना उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार तर प्रा. प्रविण गायकर यांना कार्यक्रम अधिकारी म्हणुन प्रोत्साहनपर पुरस्काराची घोषणा नुकतीच करण्यात आली. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत सन २०२०–२१ या वर्षात निस्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या निस्वार्थ सेवेचा यथोचीत गौरव करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यात कृषि महाविद्यालय, पुणेचा विद्यार्थी अनिकेत रविंद्र वाकळे यांस महाराष्ट्र राज्य सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक राज्यस्तरीय पुरस्कार तर लोणी कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रविण गायकर यांना राज्यस्तरीय प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर करण्यात आले. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी पुरस्कारर्थींचे अभिनंदन केले.

## धोरणे, संस्था व विपणनावर २१ दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न






**दि. ३० ऑगस्ट, २०२१.** बदलत्या हवामानाचा कृषि उत्पादनावर व अन्न सुरक्षेवर परिणाम होत आहे. एक टक्का तापमान वाढीमुळे पाच टक्क्यापर्यंत उत्पादनात घट होते. यासाठी सर्व विस्तार यंत्रणा, शास्त्रज्ञ, विद्यार्थी व शेतकरी हे हवामान अद्ययावत शेतीमध्ये साक्षर झाले पाहिजे. कृषि विस्तार सक्षम करण्यासाठी सरकारी खाजगी भागिदारी अजून बळकट करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन हैद्राबाद येथील मॅनेज संस्थेचे महासंचालक डॉ. पी. चंद्र शेखरा यांनी केले. महात्मा फुले कृषि

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ८, ऑगस्ट २०२१

विद्यापीठातील जागतिक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राच्या वतीने हवामान स्मार्ट शेतीसाठी धोरणे, संस्था व विपणन या विषयावर २१ दिवसांचे ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यासक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. पी. चंद्र शेखरा प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील भा.कृ.अ.प.चे माजी उपमहासंचालक व महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे उपस्थित होते. यावेळी नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. व्ही.व्ही. सदामते, जयपूर येथील कृषि विपणन राष्ट्रीय संस्थेच्या सहाय्यक संचालीका डॉ. सुची माथुर, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. कोकाटे म्हणाले की जागतीक संघटनेच्या सचिवांनी आवाहन केले आहे की पुन्हा एकदा चांगले जग घडवू या. हे चांगले जग घडविण्यासाठी आपल्याला शेती समृध्द करणे गरजेचे आहे. शेती समृध्द करण्यासाठी शेती विषयक सक्षम धोरणे राबविणे आणि विपणन व्यवस्था सक्षम करणे गरजेचे आहे. डॉ. सदामते आणि डॉ. माथुर यांनी या प्रशिक्षणासंदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. अहिरे यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले. डॉ. गोरंटीवार यांनी कास्ट–कासम प्रकल्पाची माहिती दिली. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत ऑनलाईन प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. उत्कृष्ट प्रकल्पांना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे आणि डॉ. सेवक ढेंगे यांनी केले तर आभार डॉ. संजय सपकाळ यांनी मानले.

## विद्यापीठ शास्त्रज्ञांची युवा उद्यान पंडित राहुल रसाळ यांच्या हवामान अद्ययावत शेतीला भेट





**दि. ३१ ऑगस्ट, २०२१.** हवामान बदलाचा अभ्यास करून पर्यावरणाला कोणतीही हानी न पोहोचवता उत्पादन घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये कार्यरत आहे. या प्रकल्पाच्या उदिष्टानुसार हवामान अद्ययावत विविध तंत्रज्ञानप्रणाली विकसित करून ती शेतकऱ्यापर्यंत पोहोचविणे व नाविन्यपूर्ण प्रयोगातून शेती उत्पादन घेत असणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतीला भेट देऊन त्या बाबींचा अभ्यास करणे या करिता एक दिवसीय अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात

आले होते. या अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज येथील युवा उद्यान पंडित श्री. राहुल रसाळ यांच्या प्रयोगशील शेतीस भेट देऊन त्यांनी अवलंबलेल्या नाविन्यपूर्ण शास्त्रीय आधुनिक शेती पद्धती जाणून घेतल्या. या अभ्यास दौऱ्यात प्रकल्पातील एकूण १५ शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील गोरंटीवार, सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, प्रकल्पाचे खरेदी अधिकारी डॉ. अतुल अत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री राहुल रसाळ यांचा कल हवामान अद्ययावत सेंद्रिय शेती करण्याकडे असून ते द्राक्ष, डाळिंब व भाजीपाला उत्पादन घेत आहेत. यामध्ये फळपिकांना स्लरी देण्यासाठी ट्रक्टरचलित स्लरी यंत्र स्वतः तयार केले आहे. त्यांची संपूर्ण शेती हि ठिबक सिंचनाखाली असून द्राक्ष बागेत सबसरफेसचा वापर करण्यात आलेला आहे. ते शेतीमध्ये कारले, करटोली, ढोबळी, टोमॅटो ही भाजीपाला पिके बिगर हंगामी घेण्यावर भर देतात. तसेच त्यांनी स्वतःची जीवाणू प्रयोगशाळा व हवामान केंद्र उभारले असून यामध्ये विविध संवेदक (सेन्सर) चा वापर केला आहे. यात प्रामुख्याने स्वयंचलित हवामान केंद्र, इ.टी. गेज मिटर, पी. एच. आणि इ. सी. सेन्सर यांचा वापर करण्यात आलेला आहे. फवारणीकरिता परदेशी बनावटीचा इलेक्ट्रोस्टॅटिक ब्लोअरचा वापर करतात. यामुळे किडनाशकाची ४० टक्के पर्यंत बचत होत असल्याचे सांगितले. फवारणीसाठी आर. ओ. पाण्याचा वापर करतात. त्यासाठी त्यांनी आर. ओ. प्लान्ट उभारला आहे. भेटी दरम्यान शेतीबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवून अभ्यास व अनुभव याची योग्य सांगड घालून नव नवीन प्रयोग केल्यास शेती फायदेशीर ठरू शकते. कृषी उत्पादन घेताना ते अंशरहित निर्यातक्षम दर्जाचे असावे याकडेही लक्ष दिले पाहिजे असे मत श्री. राहुळ रसाळ यांनी व्यक्त केले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**दि. १५ ऑगस्ट, २०२१.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. डॉ. देवकर यांनी झेंडा वंदनानंतर उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने कृषि महाविद्यालयातील गत वर्षातील कामगिरीचा आढावा देऊन कृषि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कृषि महाविद्यालय आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या प्रती असलेल्या अपेक्षा पूर्ण

करण्याबाबत आवाहन केले. स्वातंत्र्य दिन प्रसंगी कु. निधी पाटील आणि कु. नेहा गवळी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर केले. त्यास उपस्थितांनी उस्फुर्त दाद देऊन त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी कृषि महाविद्यालयातील क्रीडांगण तसेच प्रक्षेत्रावर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी कृषी महाविद्यालयातील डॉ. सोमनाथ सोनवणे, डॉ. चंद्रशेखर पुजारी, डॉ. एम एस महाजन, डॉ. जी.बी. काबरे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. पी.डी. सोनवणे, डॉ. तुळशीदास पाटील, डॉ. डी. एच. कंखरे, डॉ. खुशाल बराटे, तंत्र अधिकारी डॉ. संदीप पाटील, एन.सी.सी. अधिकारी ले.प्रा. पंकज देवरे, एन.एस.एस. अधिकारी डॉ. एस.डी. पाटील व डॉ. विपुल वसावे, सहायक कुलसचिव श्री. व्ही. टी. पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र सूर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. कुलदीप पाटील यांनी केले.

## कृषि विद्यापीठात आजादीका अमृत महोत्सव वीथ फिट इंडिया फ्रिडम रन कार्यक्रम संपन्न





**दि. १४ ऑगस्ट, २०२१.** १७ बटालीयन, राष्ट्रीय छात्र सेना यांचे निर्देशानुसार स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने फिट इंडिया मिशन अंतर्गत आजादीका अमृत महोत्सव विथ फिट इंडिया फ्रिडम रन २.० (२ कि.मी.) ही स्पर्धा महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आयोजीत करण्यात आली होती. या मिनी मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वाटपाच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की आपल्या जीवनात आरोग्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येकाने आपले शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी दररोज व्यायाम, योग तसेच चालणे किंवा धावणे यासारखे प्रयत्न निरंतर करणे  गरजेचे आहे. यावेळी कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे, डॉ. तानाजी नरुटे, डॉ. उत्तम चव्हाण, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, एन.एस.एस. व सुरक्षा अधिकारी प्रा. सुनिल फुलसावंगे, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक कल्याण मेटे, द्वितीय क्रमांक अभिषेक घाडगे तर तृतीय क्रमांकाचे बक्षीस विकास भिंगारदे यांना मिळाले. यावेळी कर्मचाऱ्यांमधून प्रथम बक्षीस डॉ. श्रीमंत रणपिसे व डॉ. पंडित खर्डे यांना तर उत्तेजनार्थ द्वितीय बक्षीस डॉ. प्रमोद

रसाळ व डॉ. उत्तम चव्हाण यांना विभागून देण्यात आले. यावेळी डॉ. चौहान यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.फुलसावंगे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापकांसाठी यशदा येथे क्षमतावृद्धी प्रशिक्षणे संपन्न



**दि. ३० ऑगस्ट, २०२१.** कृषि महाविद्यालय, पुणे व विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथील प्राध्यापक, शास्त्रज्ञ आणि कर्मचारी यांचेसाठी एकुण ५ क्षमतावृद्धी प्रशिक्षणांची श्रृंखला यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती. प्रत्येक प्रशिक्षणासाठी २० ते २२ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. कोरोना लॉकडाऊननंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थींना ऑफलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आलेली ही पहिलीच प्रशिक्षण श्रृंखला असल्याचे यशदामार्फत सांगण्यात आले. सदर प्रशिक्षणामध्ये सोशल मिडीया:स्वरुप व व्याप्ती, विज्ञान अध्यात्म आणि शिक्षण, निरामय जीवनशैली, शिक्षण कौशल्य, ताण–तणाव व्यवस्थापन, संवाद कौशल्य आणि संगितातून तणावमुक्ती अशा वस्तुनिष्ठ आणि महत्वाच्या विषयांवर तज्ञांची व्याख्याने सादरीकरणासह आयोजित करण्यात आली होती. सदर प्रशिक्षणासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत अर्थसहाय्य करण्यात आले होते. कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. महाविद्यालय स्तरावर प्रशिक्षणार्थींची निवड व इतर संयोजनाची जबाबदारी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील यांनी तर यशदाचे डॉ. बबन जोगदंड यांनी सर्व प्रशिक्षण सत्रांचे सूत्रसंचालक म्हणुन महत्वाची भुमिका पार पाडली. एकुण १०२ प्रशिक्षणार्थींना सदर प्रशिक्षणाचा लाभ झाला.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ८, ऑगस्ट २०२१

## विभागीय विस्तार केंद्र, पुणे येथे शेतकरी संवाद कार्यक्रम संपन्न



**दि. ८ ऑगस्ट, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या विभागीय विस्तार केंद्र, पुणे व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठ आपल्या दारी, तंत्रज्ञान गंगा घरोघरी अंतर्गत शेतकरी संवाद कार्यक्रम थेट शेतकऱ्याच्या शेतावर आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन शेतकरी शास्त्रज्ञ मंच, पुणेचे सदस्य श्री. विपीन शहा, मु.पो. थेऊर, ता. हवेली, जि. पुणे यांच्या शेतावर करण्यात आले होते. या शेतकरी संवाद कार्यक्रमाचा विषय ड्रॅगन फ्रुट लागवड तंत्रज्ञान होता. या कार्यक्रमासाठी विभागीय विस्तार केंद्र, पुणे येथील उद्यानविद्या विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुनिल जोगदंड, मंडल कृषि अधिकारी, पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक व शेतकरी उपस्थित होते.

## डॉ.आनंद सोळंके केंद्राई जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत



**दि. ९ ऑगस्ट, २०२१.** निफाड येथील केंद्राई कृषि व ग्रामविकास संस्थेचा सन २०२१ या वर्षीचा केंद्राई भूषण पुरस्कार

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील विभाग प्रमुख, कृषि विद्या विभाग व प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे), बियाणे विभाग या पदावर कार्यरत असलेले डॉ. आनंद सोळंके यांना लासलगाव येथे संगमनेरच्या नगराध्यक्षा सौ. दुर्गा तांबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते हंसराज वडघुले, निफाड सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजी ढेपले, कॉंग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सचिन होळकर, किसान क्रांती सेनेचे योगेश रायते, काड्र्स संस्थाध्यक्ष वसंत शिंदे, संकल्प सेवाभावी संस्थाध्यक्ष संजय आहेर आदींसह मान्यवर उपस्थित होते. डॉ. आनंद सोळंके यांनी विद्यापीठाच्या विविध पदांवर कार्यरत असतांना समर्पीतपणे शेतकऱ्यांची सेवा केली आहे. यापूर्वी डॉ. सोळंके यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. केंद्राई जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांनी त्यांचे अभिनंदन केले.

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ८, ऑगस्ट २०२१

## सप्टेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास इमिडाक्लोरोपीड १७.८ एस.एल. २.५ मिली ग्रॅम किंवा ॲसीफेट ७५ ग्रॅम एस. पी. १० ग्रॅम किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास ट्रायझोफॉस ४० इ. सी. २५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळ्यामध्ये सतत २–३ दिवस, ८–१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरोक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.

### ऊस

- सहा ते आठ आठवडे वयाच्या आडसाली लागणीस को.८६०३२ जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र,स्फुरद,पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा देण्यासाठी ४३४ किलो युरिया (२०० किलो नत्र) तर इतर जातीसाठी शिफारशीत (४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद, पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा देण्यासाठी ३४७ किलो युरिया (१६० किलो नत्र) प्रती हेक्टरी वापरावी. तसेच सदरची खतमात्रा देताना ६ किलो युरियासाठी १ किलो या प्रमाणात निंबोळी पेंडीची भुकटी चोळून द्यावी.
- आडसाली उसाची लागण केलेल्या क्षेत्रात उगवण विरळ झालेल्या ठिकाणी रोप लागण पध्दतीने वेळीच नांग्या भरुन घ्याव्यात.
- पूर्वहंगामी ऊस लागणी करीता पूर्व मशागतीची कामे पूर्ण करा. मशागत केलेल्या क्षेत्रात हेक्टरी २५ टन शेणखत किंवा कंपोष्ट खत वापरावे. यापैकी अर्धे शेणखत(१२.५ टन) दुसऱ्या नांगरटीपूर्वी व अर्धे शेणखत(१२.५ टन) लागणीपूर्वी सरी सोडण्यापूर्वी द्यावे.
- पांढरी माशीचा प्रादुर्भाव वाढल्यास कोषग्रस्त पाने कापून काढावीत व नंतर मेलॅथिऑन ५०% प्रवाही हे किटकनाशक २० मिली. १० लिटर पाण्यातून फवारावे.
- उसाच्या पानांवरील तांबेरा व पोक्का बोईंग या रोगांच्या नियंत्रणाकरिता ०.३ टक्के मँकोझेब किंवा ०.१ टक्के कार्बेन्डॅझीम या बुरशीनाशकाची १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसाच्या अंतराने स्टिकर वापरुन फवारणी करावी.

### हरभरा व्यवस्थापन

- हरभरा पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवाच्या २–३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे.
- २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर पर्यंत जिरायती हरभरा बीजप्रकिया करुन पेरावा (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन/

किलो बियाणे किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम / १० किलो बियाणे ).

- शिफारशीत खत मात्रा पेरणीवेळी द्यावी.

## भात

- पाणी व्यवस्थापन भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी. फुलोरा व दाणे भरण्याच्या अवस्थेत १० सें.मी.
- पीक संरक्षण तपकिरी तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रिड २० एस.एल. (१२५ मिली) किंवा थायोमिथॅक्झाम २५ डब्लु.जी. (१०० ग्रॅम) किंवा इथोफेनफॉस १० ई.सी. (५०० मिली) किंवा ॲसिफेट ५० डब्ल्यु.पी.(९५० ग्रॅम) किंवा बुप्रोफेजीन २५ एस.सी. (१००० मिली) प्रती हेक्टरी फवारावे.

## कडधान्य पिके

### मूग आणि उडिद

- पिकाच्या पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.

### तूर

- पीक फुलोऱ्यात असताना किड व रोगांपासून संरक्षण करावे. यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

## नाचणी पीक

### पीक संरक्षण

- लष्करी अळी व पाने खाणारी अळी : खरीपात ३० ते ८० टक्के नुकसान. गवताळ–डोंगरी भागात जास्त प्रादुर्भाव, बंदोबस्त शेतातील/बांधावरील गवत काढून टाकावे. मिथील पॅरॉथिऑन भुकटी हेक्टरी २० ते २५ किलो धुरळावी.
- मावा – तुडतुडे : प्रादुर्भाव सुरुवातीच्या काळात जास्त रस शोषून घेतात. कर्बग्रहण मंदावते. बंदोबस्त – रोगर ३० टक्के प्रवाही १० मि.ली. किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- करपा रोग : प्रादुर्भाव दिसून येताच डायथेन एम–४५, २५ ग्रॅम १० लिटर पाण्यातून फवारावे.
- पावसाचा ताण पडल्यास संरक्षित पाणी देणे.

## बाजरी

- पिकाची काढणी व मळणी करावी. धान्य उन्हात चांगले वाळवून साठवून ठेवावेत.

## सोयाबीन

- पिकाची काढणी व मळणी करावी व धान्य उन्हात चांगले वाळवून साठवून ठेवावेत.

## रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवडा – शेतजमीन पेरणीसाठी तयार करावी

- सप्टेंबर दुसरा पंधरवडा – खालील शिफारशीनुसार ज्वारीची पेरणी करावी.

अ) जमिनीच्या प्रकारानुसार शिफारशीप्रमाणे जातींची निवड करावी.

| जमिनीचा प्रकार | जातीचे नाव | जिरायत/बागायत |
|---|---|---|
| हलकी जमीन | फुले अनुराधा | जिरायत |
| मध्यम जमीन | फुले सुचित्रा | जिरायत |
| भारी जमीन | फुले वसुधा | जिरायत |
| मध्यम ते भारी जमीन | फुले रेवती | बागायत |
| विशेष उपयोगासाठी | फुले मधुर–हुरडा | जिरायत |
| | फुले पंचमी–लाह्या | जिरायत |
| | फुले रोहिणी–पापड | जिरायत |

ब) जमिनीच्या प्रकारानुसार रासायनिक खताची मात्रा शिफारशीप्रमाणे द्यावी.

| जमिनीचा प्रकार | खताचे हेक्टरी प्रमाण (किलो/हे) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोरडवाहू | | | बागायती | | |
| | नत्र | स्फूरद | पालाश | नत्र | स्फूरद | पालाश |
| हलकी | २५ | – | – | – | – | – |
| मध्यम | ४० | २० | – | ८० | ४० | ४० |
| भारी | ६० | ३० | – | १०० | ५० | ५० |

नत्र दोन हप्त्यांत (पेरणीवेळी निम्मे व पेरणीनंतर एक महिन्याने निम्मे) संपूर्ण स्फूरद व पालाश पेरणी वेळेस द्यावे. कोरडवाहू जमिनीस संपूर्ण नत्र व स्फूरद पेरणीवेळेस द्यावे.

## फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – पक्व फळांची काढणी करावी. फळांवरील रस शोषणाऱ्या पतंगाचे नियंत्रण करावे.
- सिताफळ – डोळे पडलेल्या फळांची काढणी करावी.
- बोर – भुरी व फळे पोखरणाऱ्या माशी वर नियंत्रण करावे.
- अंजीर – मध्यम ते हलकी छाटणी करावी.
- जांभूळ – बाग ताणावर सोडावी.
- कागदी लिंबू – शिफारशीत खतमात्रेच्या ३० टक्के नत्राची मात्रा द्यावी. हस्त बहाराचे नियोजनासाठी १००० पीपीएम सायकोसील (सीसीसी) ची फवारणी करावी.
- मोसंबी व कागदी लिंबू – रस शोषणारा पतंग : गंध सापळ्याचा वापर करावा (२०० मिली क्लोरोपायरीफॉस + १ किलो

गुळ + १ लि. मोसंबीचा रस + १० लि. पाणी मिसळून त्यामधून प्रत्येकी ५०० मिली द्रावण घेऊन हेक्टरी १५–२० सापळे लावावे.) कॅंकर / खैऱ्या रोग : स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यातून फवारणी करावी.

### भाजीपाला व्यवस्थापन

- कांदा पिकामधील तण नियंत्रणासाठी लागवडीपासून २१ दिवसांनी रासायनिक तणनाशकाची फवारणी करावी. फवारणीवेळी शेतामध्ये वापसा स्थिती असावी याची काळजी घ्यावी.
- कांदा पीक एक महिन्याचे झाल्यावर नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- कांदा पिकावर येणारा करपा व फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.
- खरीप टोमॅटो, वांगी, मिरची, भेंडी, गवार व वेलवर्गीय भाजीपाला तसेच कोबी व फ्लॉवर पिकामध्ये खांदणी करून झाडांना भर लावावी.
- टोमॅटो पिकास ताटी पध्दतीने आधार द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाला पिकांना मंडप अथवा ताटी पध्दतीने आधार द्यावा.

### आले

- पुढील वर्षाच्या आले लागवडीसाठी योग्य बेण्याची निवड सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यातच पुर्ण करावी.
- या महिन्यात रोग विरहीत आले बेणे प्लॉटची पाहणी करावी व स्थानिक हवामानानुसार, जमिनीच्या मगदुरानुसार जाती निवडाव्यात.
- पाने गुंडाळणारी अळीपासून आले पिकाचे संरक्षण करावे. आले पिकावर ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयापासून ते नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवडयापर्यंत या किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडीची अळी हिरवट रंगाची असून ती अंडयातून बाहेर पडल्यानंतर स्वत:च्या शरीराभोवती पान गुंडाळून घेते व आत राहून पाने खाते. किडीच्या प्रादुर्भाव दिसताच गुंडाळलेली पाने गोळा करुन नष्ट करावीत. तसेच ५% निंबोळी अर्क अथवा कार्बारील ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून त्याची फवारणी करावी.

### पशुसंवर्धन

- अस्वच्छतेमुळे स्तनदाह होवु नये यासाठी कासेची स्वच्छता ठेवावी.
- वादळी पावसाचे दिवस असल्याने जनावरांचे रक्षणासाठी नियोजन करावे. उच्च दाबाच्या विजेच्या तारा व वादळी विजेपासून रक्षणसाठी उपाय करावे.
- पावसामुळे गोठ्यातील वातावरणात आर्द्रता वाढते आणि जनावरे अस्वस्थ होतात. हे टाळण्याकरीता गोठयातील हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.

### अवजारे

### ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे तयार करण्याचे अवजार

- अवर्षन प्रवण विभागामध्ये खरीप पीक न घेतलेल्या मध्यम काळया जमिनीत पावसाचे पाणी
- मुरविण्यासाठी ६ मि. द २ मि. आकाराचे बंदिस्त वाफे तयार करण्यासाठी
- ३५ अश्वशक्ती ट्रॅक्टरद्वारे सहज चालविता येते.
- प्रक्षेत्रीय क्षमता ४.०० ते ४.५० हेक्टर प्रति दिवस.

प्रकाशक : डॉ. शरद गडाख
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
श्री. सुनिल राजमाने
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : श्री. सिध्दार्थ साळवे

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४०४/२०२१